IMPACT FACTOR 3.92

ISSN 2231-6671

International Registered & Recognized Research Journal Related to Higher Education for all Subjects

# Hi-TECH RESEARCH ANALYSIS

UGC APPROVED & PEER REVIEWED RESEARCH JOURNAL

Issue : XV, Vol. - II
Year - VIII, (Half Yearly)
Feb. 2018 To July 2018

**Editorial Office :**
'Gyandev-Parvati',
R-9/139/6-A-1,
Near Vishal School,
LIC Colony,
Pragati Nagar, Latur
Dist. Latur - 413531.
(Maharashtra), India.

**Contact :** 02382 - 241913
09423346913 / 09503814000
07276305000/ 09637935252

**Website**
www.irasg.com

**E-mail :**
interlinkresearch@rediffmail.com
visiongroup1994@gmail.com
mbkamble2010@gmail.com

**Published by :**
JYOTICHANDRA PUBLICATION
Latur, Dist. Latur - 413531 (M.S.)India

**Price : ₹ 200/-**

**CHIEF EDITOR**

**Dr. Balaji G. Kamble**
Research Guide & Head, Dept. of Economics,
Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya,
Latur, Dist. Latur.(M.S.) (Mob. 09423346913)

**EXECUTIVE EDITORS**

**Dr. Milind V. Lokhande**
Dept. of Zoology,
Indira Gandhi (Sr.) College,
Nanded, Dist. Nanded (M.S)

**Scott. A. Venezia**
Director, School of Business,
Ensenada Campus,
California, (U.S.A.)

**Dr. Omshiva V. Ligade**
Head, Dept. of History
Shivjagruti College,
Nalegaon, Dist. Latur.(M.S.)

**Bhujang R. Bobade**
Director Manuscript Dept.,
D. A. & C. Research Insititute,

**Dr. Dileep S. Arjune**
Professor & Head, Dept. of Economics
J. E. S. College,
Jalna, Dist. Jalna(M.S.)

**Dr. U. Takataka Mine**
Tokiyo (Japan)

**Dr. Babasaheb M. Gore**
Dean- Faculty of Education & M.C.
Member,S.R.T.M.U, Nanded.(M.S.)

**Dr. Nilam Chhanghani**
Dept. of Economics,
KNG Mahavidyalaya
Karanja Lad, Dist. Washim (M.S.)

**DEPUTY-EDITOR**

**Dr. G . V. Menkudale**
Dept. of Dairy Science,
Mahatma Basweshwar College,
Latur, Dist. Latur.(M.S.)

**Dr. C.J. Kadam**
Head, Dept. of Physics,
Maharashtra Mahavidyalaya,
Nilanga, Dist. Latur.(M.S.)

**Dr. Balaji S. Bhure**
Dept. of Hindi,
Shivjagruti College,
Nalegaon, Dist. Latur.(M.S.)

**Dr. Bharat S. Handibag**
Dean, Faculty of Arts,
Dr. B.A.M.U. Aurangabad(M.S).

**Dr. S.B. Wadekar**
Dept. of Dairy Science,
Adarsh College,
Hingoli, Dist. Hingoli.(M.S.)

**Dr. Shivaji Vaidya**
Dept. of Hindi,
B. Raghunath College,
Parbhani , Dist. Parbhani.(M.S.)

**CO-EDITORS**

**Dr. R.N. Salve**
Head, Dept. of Sociology,
Shivaji University,
Kolhapur, Dist. Kolhapur.(M.S.)

**Ghansham S. Baviskar**
Dept. of English,
RNC & NSC College,
Nasik, Dist. Nasik.(M.S.)

**Dr. Kailash Tombare**
Head, Dept. of Economics,
Devgiri Mahavidyalaya,
Aurangabad.(M.S.)

**Dr. Kailash R. Nagulkar**
Head, Dept. of History,
Gulab Nabi Azad College,
Barshi Takli, Dist. Akola.(M.S.)

S.P. Mahavidyalaya, Bhoom
Bhoom
Tq. Bhoom Dist. O.bad

Issue : XV, Vol. II
HI-TECH RESEARCH ANALYSIS
IMPACT FACTOR 3.92
ISSN 2231- 6671
Feb. 2018 To July 2018

# INDEX



| Sr. No | Title for Research Paper | Page No |
|---|---|---|
| 1 | Entrepreneurship Development for Economic Growth<br>**Dr. M. P. Morghade** | 1 |
| 2 | A Role of STLC in Software Development Life Cycle<br>**Anita R. Gupta** | 5 |
| 3 | कन्या भ्रुण हत्या (एक सामाजिक समस्या)<br>**सतिश ससाणे** | 13 |
| 4 | ग्रामीण वसाहतीची उत्क्रांती<br>**डॉ. जगन्नाथ व्ही. दडवे** | 17 |
| 5 | सिंधु संस्कृतीतील मातृदेवता निर्ऋती : एक ऐतिहासिक अभ्यास<br>**रामचंद्र गुर्लिंग घुले** | 26 |
| 6 | समाज आणि शिक्षण : एक चिंतन<br>**एच. ए. उराडे** | 36 |
| 7 | तुकडोजी महाराज यांच्या साहित्यातील सांस्कृतिकतेचे स्वरुप<br>**गौतम ऊ. तिजारे** | 43 |
| 8 | मराठी व्याकरणातील नवीन दृष्टिकोण<br>**सुभाष कदम** | 53 |



S.P. Mahavidyalaya, Bhoom
Bhoom
Tq. Bhoom Dist. O.bad

7

# तुकडोजी महाराज यांच्या साहित्यातील सांस्कृतिकतेचे स्वरुप

गौतम ऊ. तिजारे
संशोधक
जेजेटी विद्यापीठ,
झुनझुनु, (राजस्थान) भारत

## Research Paper - Marathi

**प्रस्तावना**

या जगात प्रत्येक प्राण्याला त्यात मानवही आलाच, त्याला विशिष्ट मर्यादा आहे. मानवाचे अंतिम ध्येय आहे. जगाचे रक्षण करणे, जगाची इश्वराने सांगितलेल्या मार्गाने चालणे, मानवाला शोभेल आशाच सवयीने चालणे, सर्व मानव आम्ही एक आहोत हे लक्षात घेऊन विश्व कूंटुंबाची निर्मिती करणे. 'अर्थात या ध्येयाची पूर्तता करताना येणाऱ्या अडथळ्यांना सत्य - अहिंसेने दूर सारणे, हे त्यांना अपेक्षित आहे. माणसाने माणसासारखेच वागायला हवे, हे ही तेवढेच महत्वाचे आणि दूसऱ्याला आपलेसे करण्यात आम्ही कमी पडलो. त्याचे खापर दूसऱ्यावर फोडण्यापेक्षा अहंभावाला बाजूला सारून आपली मर्यादा ओळखून जो हे करण्यास सक्षम आहे त्या 'महा मानवाला' शरण जावे.

मनूष्य धर्माचा खरा मार्ग 'जो प्रेम आणि परस्पर सहकार्य' आहे तो विसरलेला आहे आज धर्माच्या नावावर मनूष्य स्वर्ग सत्ता आणि प्रतिष्ठा प्राप्त करण्यामागे लागलेला आहे. थोडक्यात धर्मच पतीत झाला आहे. खऱ्या धर्माची ओळख जो पर्यंत आरण या विश्वात करून देणार नाही तोपर्यंत विश्वात मानवता प्रस्थापित होणार नाही. विश्व हे यूध्दाच्या भीतीखाली राहिल म्हणूनच परस्परांमध्ये प्रेम निर्माण केले तर मानवतेवर उपकार ठरतील,कार्य गूरूदेव सेवा मंडळ करीत आहे.

मनूष्याला ईश्वराच्या विशाल नियमांचे ज्ञान देणे धर्माची पूर्णता आहे. त्यासाठी सक्रीय राहून देशादेशातील, माणसा-माणसातील साशंकता, गैरसमज दूर करून प्रेमभाव निर्माण केला तरच या जगात विश्वशांती प्रस्थापित होईल आणि त्यातच या परिषदेची सफलता आहे.

S.P. Mahavidyalaya, Bhoom
Bhoom
Tq. Bhoom Dist. O.bad

'धर्म संमेलन म्हणजे त्याग, केवळ भाषण देणे नव्हे' असे राष्ट्रसंत जेव्हा म्हणतात तेव्हा त्यांच्या विचारातील वागण्यातील स्पष्टता आचारातील शूध्दता दिसून येते. आजवर धर्माच्या नावावर आवाज उठवणाऱ्या महापूरूषांच्या ह्दयात पावित्र्य होते. चारित्र्य शूध्द होते, आत्मबल, विश्वसेवा शूध्द प्रेम होते. एक सच्चेपणा होता म्हणूनच ते अमर झाले. त्याच धर्माचे पालन करण्यासाठी, प्रगती करण्यासाठी परमेश्वराला सामर्थ्य मागतात, त्यातून त्यांची विश्व कल्याणाची आस व्यक्त होते.''

ब्रिटीशांच्या पूर्वी लहान लहान गट, जाति व संस्थानं करून लोक बसले होते व आपसांतच भांडत होत. पेढांरी सूटत आणि 'बळी तो कान पिळी' या न्यायानं लोक परस्परांना खात हे आमच्या शूर पूर्वजांचं कृत्य भूषणावह समजता येईल का तेयावेळी ही दूही नि ती गटांची भांडणं होची, स्वतःच्या स्वार्थासाठी देश खड्ड्यात गेला तरी पर्वा नाही.अशी फूटीर व कूटील वृत्ती होती, अन म्हणूनच मोठा देश मूठभर परकी लोकांनी गूलाम करून घेतला. आजही आम्ही तीच पक्षांधता व स्वार्धधता खेळवीत बसलो आहोत., सत्तेसाठी आपसात ओढाताण करीत आहोत. तेव्हा तोच रोग पून्हा नाही झाला तर दूसरा तरी अवश्य होईल. संकट त्या नाही तर दूसऱ्या तरी दिशेनं आमच्यावर झडप घालील हे उघड आहे. अशा स्थितीत आमच्या सूरक्षितपणे विकास व्हावा असंजर वाटत असेल तर आमचा देशच आम्हा सर्वाचा जात प्रांत व पंथ बनला पाहिजे, किंबहूना त्याहीपूढं कर्तव्यानं मजल गेली तर बरंच आहे. असं मानणारा मी माणूस आहे.''

या दृष्टीमधून रूढी ,परंपरा यांचे मूर्तीभंजन केले ाहे. चाकोरीबध्द जीवनाचा अट्टाहास सोडून आधूनिक यूगात पूरोगामी विचारांची कास धरण्याचा आग्रह त्यांनी धरला. आग्रह धरताना रचनात्मक दृष्टीने नव समाज रचनेचे स्वप्न ते उराशी बाळगतात. प्रत्येक माणसाच्या मनात परंपरेने जो रूजलेला धर्म आहे त्या धर्माच्यां मूर्तीचे, संकल्पनेचे मूर्तीभंजन त्यांनी केले आहे. विश्वधर्माचा पाया रचण्यासाठी अखंड धडपड करताना ते आपल्याला दिसतात. प्रत्येक माणसात हा धर्म रूजवायचा तर प्रत्येक मामसाच्या अंतःकरणाला स्पर्श करण्यासाठी ते दिनभर भागना और रातभर जागना' या न्यायाने फिरत राहिले. त्यांच्या अखंड भ्रमंतीत त्यांनी ह्याच विश्वधर्माचे महत्व लोकांना सांगितले. ह्याच एका गोष्टीसाठी त्यांनी राज्य आणि देशाच्या सीमा ओलांडल्या. त्यांचा विश्वधर्म जगाच्या कान्याकोपऱ्यात नेण्यासाठी ते जपानला गेले. जगभरातल्या धर्ममार्तडांना विश्वधर्म सांगण्यासाठी जागतिक धर्म परिषदेत त्यांनी या विश्वधर्माचे तत्वज्ञान मांडले. त्यांच्या या अतूलनीय कामगिरीबद्दल प्रा. लक्ष्मीधर मूळे लिहितात.

''जपानमध्ये वं. विश्वर्धम परिषदेतील काही प्रमूख प्रतिनिधींची व यावक - यूवतीची संवाद संभाषणे झालीत तेव्हा या विदेशीयांचे शंका समाधान केले. या विश्वालाच एक ग्रंथ मानले होते.

S.P. Mahavidyalaya, Bhoom
Bhoom
Tq. Bhoom Dist. O.bad

निर्सग व नैसर्गिक सत्याचा अभ्यास करीत असताना त्यांचे विश्वधर्मविषयक विचार बनत गेले. खऱ्या अर्थाने त्यांनी 'माणसे''वाचतील.त्येक माणसाच्या मनात शिरून त्यांच्या ह्दयाला स्पर्श करून आत्मतत्व सत्य शोधण्याचा त्यांनी प्रत्यन केला. विश्वातील प्रत्येक वस्तूला स्वतंत्र अस्तित्व आहे, मूल्य आहे,तेव्हा त्याचा यथोचित आदर करून त्याची श्रेष्टता अंगिकारतच विश्वकूटूंब बनवायचे आहे, विश्वधर्म पाळायचा आहे. फक्त त्यासाठी गरज आहे ती माणसाच्या अंतःकरणाला स्पर्श करण्याची प्रत्येक तत्वाच्या खोलवर पोहचून त्याच्या मूलस्वरूपाचे दर्शनच सर्व अनूभवाचे उगमस्थान आहे. विश्वधर्माचा पाया याच अनूभवावर आधारित आहे. हाच धागा घेऊन गूरूदेव सेवामंडळ विविध सेवाकार्य करून विश्वधर्म मजबूत करीत आहे.

तूकडोजींच्या विश्वधर्मात बूवाबाजीला आणि भोंदूगिरीला कोठेही स्थान नाही. साध्या भोळ्या अडाणी जनतेला फसवणारे ढोंगी साधू पदोपदी आपल्याला भेटतात.समाजाला ओरडून धर्माची शिकवण देणारे हे ढोंगी मात्र स्वतः धर्माच्या सागरात कोरडेच असतात. लोकांना एकत्र जमवून मोठमोठे यज्ञयाग घडवून आणतात. मोठमोठ्या महापूजा मांडून भोजनावळी ही घडवतात. बरेच साधू संन्यासी आपला वेष धार्मीक बनवतात. गोपीचंदन टिळा, तूळशीची माळ, भगवी वस्त्रे, खद्यावर पताका अशा बाह्य गोष्टींनी स्वतःला फार मोठे धार्मीक बनवतात. आतून मात्र लंगोटीसाठी भांडण करणाऱ्या क्षूद्र मनोवृत्तीचे असतात. मोह, माया, लोभ, याच्यापासून मूक्ती झाली नाही पण समाजाला दिशा दाखवायला निघाले आहेत.

मन स्थिर नसणाऱ्या माणसांनी कोणतेही ढोंग आणले तरी मूळ प्रवृत्तीत बदल होत नाही. अगोदर स्वतःला बदलावे लागते नंतर जग बदलावे लागते. धर्माच्या बाह्य गोष्टीचा अवलंब करून साधत नाही या सर्व गोष्टींना तूकडोजीच्या विश्वधर्मात कोठेही स्थान नाही. संत तूकारामांप्रमाणे राष्ट्रसंत तूकडोजीही अशा प्रवृत्तीच्या विरोधात दंड थोपटून उभे राहतात. हे देन्ही संत समाजसूधारकाच्या भूमिकेतून आपली समाजनिष्टा भूमिका मांडतात. पोथीनिष्ठ भूमिकाया दोघआनांही मान्य नाही. या दोन्ही संतांच्या धार्मिक भूमिकेत बरीचशी साम्यस्थळे आहेत. मात्र तूकाराम मध्ययूगीन काळातील असल्यामूळे काळाच्या मानाने काळाशी सूसंगत तर काही ठिकाणी काळाच्याही पूढे अशीच भूमिका घेताना दिसतात. त्या तूलनेत तूकडोजीही आधूनिक विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या यूगात जन्माला आल्यामूळे विज्ञानाच्या पाऊलखूणा त्यांच्या काव्यामध्ये उमटलेल्या दिसतात.

तुकडोजींच्या साहित्यातील मंदिराची कल्पना :

देव दसा दगडधोंड्यांचा नाही त्याचप्रमाणे राष्ट्रसंताचे मंदिर ही घडीव चिऱ्यांनी, सिमेंट विटांनी बांधलेले चार भिंतीचे नाही त्यांचा देव जसा दगडधोंड्यात मावत नाही म्हणूनच त्यांचे मंदिरही चार भिंतीत मावणारे नाही. ग्रामगीतेत त्यांनी विकासासाठी 'ग्राम' हे एकक वापरले आहे. हे त्यांचे फार मोठे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. मध्ययूगिन आणि आधूनिक इतिहासात असे एकक मानून त्या

S.P. Mahavidyalaya, Bhoom
Bhoom

अनूषगांने सर्वांगिंण विचार करून परिपूर्ण विकासाची संकल्पना मांडणारे एकमेव संत आणि समाजसूधारक - राष्ट्रसंत तूकडोजी महाराज हेच ठरतात.

आधूनिक काळातील मूर्तिभंजनाचे हे एक सर्वांगसूंदर असे उदाहरण आहे. हजारो वर्षापासून मंदिर आणि मंदिरातील मूर्ती यांची पूजा करण्याची प्रथा भारतीय समाजात दिसून येते. बहूदेवत्व मानणाऱ्या आपल्या देशात सगूण साकार भक्तीने मूर्तीपूजेची प्रथा रूढ झाली. मूर्तीमध्ये देवत्वाची कल्पना करून भारतीय समाजात ह्या प्रथेचे खूप मोठ्या प्रमाणावर अनूकरण करण्यात आले. 'कणकणमें भगवान' किंवा 'चराचर' व्यापणारा ईश्वर ही संकल्पना जन्माला आली पण सामान्य, अतिसामान्य अज्ञानी माणसाला 'निर्गूण निराकाराची किंवा 'कणकण में भगवान' ची संकल्पना पचनी पडणार नाही म्हणून विश्वधर्म हा चाकोरीबध्द परंपरेवर आधारीत नाही.त्या धर्माला त्यांनी सदाचार आणि विज्ञानाची जोड दिली आहे. फक्त पारमार्थिक जगापूरताच तो मर्यादीत नाही. अध्यात्माबरोबरच त्याला ऐहिक जगाची जोड दिली आहे. पारंपारिक धर्माची मांडणी आणि आधूनिक धर्माची मांडणी अशा दोन्ही प्रकारे धर्माची मांडणी चत्वचिंतकांनी केलेली आहे. पारंपारीक मांडणी करताना ऐहिक जगाचा कोणताही विचार प्राचीन काळात झाला नाही.

स्वातंत्र्योत्तर कालावधीत सर्वात प्रथम एवढी अभिनव कल्पना मांडून प्राचीन 'मंदिर' कल्पना नाकारणारे तूकडोजी महाराज एकमेव संत होते. भाबडेपणाने विश्वात्मक पातळीवर जाऊन स्वप्नजंन न करता प्रत्यक्षात येणाऱ्या गोष्टीच त्यांनी आपल्या साहित्यात मांडल्या. अनेक तत्ववेत्यांनी आपले इप्सित मांडले. मात्र ते साध्य करण्याचा मार्ग कूठून कसा जातो ते गूलदस्त्यातच ठेवले, पण तूकडोजी महाराज मात्र विश्वधर्मातून विश्वाचे कल्याण मांडताना 'ग्राम' हा विश्वाचा पाया मानतात. त्यालाच मंदिराची उपमा देतात.ज्या गोष्टीला आपण मंदिराचे स्थान देतो. त्याच्याशी आपले नाते जडते. आधूनिक यूगात गाव, विश्व आणि देव यांच्या प्रसन्नतेत देव प्रसन्न होतो ही केवढी मोठी उदात्त कल्पना तूकडोजींनी मांडली आहे याची कल्पना ग्रामगीतेच्या या ओळीवरून येते. दगडधोंड्यांच्या देवाला चार भितींच्या मंदिराला नाकारून गावालाच मंदिर मानून विश्व घडवण्याची व देवाला प्रसन्न करण्याची अभिनव क्लृप्ती फक्त तूकडोजीच शोधू शकतात.

'' 'हे विश्वची माझे घर' असा आदर्श घालून देणाऱ्या ज्ञानेशांचे आवाहन जसे सामान्य माणसाला 'हे घरचि माझे विश्व ' अशा वास्तवातून बाहेर काढीत होते व अगोदर 'मराठीच्या विश्वात' यायला सांगत होते. त्यातीलच रामदासांचा एक प्रकार होता. रामदासांचा 'महाराष्ट्र धर्म ' हा तर खरे म्हणजे 'प्रंपच धर्म' नेटका करून मग त्याच्या बाहेर पडण्यासाठी राष्ट्राच्या धर्माकडे व नंतर विश्वाच्या 'घरा'कडे अधिकाधिक विशाल करणाराच एक महत्वाचा असा टप्पा आहे. सर्वच संताच्या बाबतीत हे लक्षात घ्यावे लागते की मातेच्या ममतेने आपल्या आसपासच्या सर्व जनतेला ते प्रेमाने

S.P.Mahavidyalaya Bhoom
Bhoom
Tq.Bhoom Dist.O.bad

गोंजारीत असले तरी त्या जनतेने 'बाल अवस्थेत' राहावे असे त्यांना कधीच वाटत नसते. त्या जनता जनार्धनाच्या वाढण्यात, मोठे होण्यात व विकसित होण्यातच त्यांना रूचि असते. नव्हे त्यांच्या जीवन-संदेशाचे खरे प्रयोजनच मूळी ते असते. 'हे विश्वचि माझे घर' या आदर्शाप्रत सर्व जनतेची वाटचाल असावी व ही उच्चतम अवस्था सर्वांना गाठता येण्यासाठी 'हे घरचि माझे विश्व' या वास्तवातून त्यांनी बाहेर पडावे, याचसाठी सर्व संतांचा खटाटोप असतो. त्याचमूळे आयूष्यभर म्हणून गाजलेले तूकडोजी महाराज राष्ट्राच्या पातळीवर येऊन, सर्व जनतेला आपल्या कूंटूंबाची वैचारीक पातळी थोडी उंचवायला सांगतात. ग्रामालाच आपले कूंटूंब समजून श्रमप्रतिष्ठेने तेथे प्रेमाची संपत्ती आणि सहकार्याची प्रतिष्ठा विकसित करण्याचे आवाहन करतात. 'ग्रामगीते' च्या एका अध्यायात वं. महाराज म्हणतात, एक कूंटूंब ऐसे सर्वही ग्राम अमूचे प्रेमळ आपूले प्रेमचि अमोल संमत आपूले श्रमचि महादौलत आपले सहकार्यचि खरि इज्जत समजावोनि द्यावे सर्वही

प्रचलित यूगात मंदिरांची जी अवस्था झाली होती ती बघून त्यांचे मन उद्विग्न होताना दिसते. मंदिराचा हेतूच मूळात मानव कल्याणासाठी असतो हे त्यांना अभिप्रेत होते. एकमेकात प्रेमभाव वाढवणारे केंद्र म्हणून मंदिर त्यांना अपेक्षित होते. मात्र धर्ममार्तंडांनी जो बाजार मांडला को पाहून त्यांचे कविमन आक्रोशाने म्हणते, 'मंदिरे, क्षेत्रे दूकाने झाली पूजा, कमाई करू लागली दक्षणा - पात्रे पूढे आली पोटासाठी मंदिराचा भव्य वाडा झाला गूंडाचा आखाडा धाक पडे घालाया मोडा सज्जनासी''

धर्ममार्तंडांनी धर्माचा प्रकाश सर्वापर्यंत पोहोचवायचा तिथे तमोयूग आणण्यासाठी प्रयत्न करावेत हीच गोष्ट त्यांना आवडत नव्हती हे या ओळीमधून दिसून येते. मंदिरांमध्ये खरे भक्त आणि साधू जमा होण्याएवजी मंदिरे म्हणजे गूंड लोकांचा आखाडा झालेला पाहून ते तथाकथित आध्यात्मिक क्षेत्राचे झालेले अधःपतन दृष्टीस आणून देतात. मंदिरामध्ये आध्यात्मिक उन्नतिसाठीचे अनेक उपक्रम राबवायला पाहिजे तिथे समाज बिघडवण्याचे उद्योग सूरू आहेत. ईश्वराच्या नावाखाली पंडे पूजारी दिवसाढवळ्या भोळ्या भक्तांची फसवणूक कशी करतात. ज्या भक्तांकडून निधी गोळा केल्या जातो त्याच भक्तांवर क़शी दहशत निर्माण केली जाते, पदोपदी राजकारण्यांचा आधार घेऊन सत्ता प्राप्त करणे, ती टिकवून ठेवणे मठ, मंदिरांच्या साम्राज्यात वाढ करणे हे उद्योग सतत रात्रंदिन कसे चालू असतात याबाबत आचार्य दादा धर्माधिकारी लिहितात, ''कौटूंबिक प्रपंचापेक्षाही परमार्थीक प्रमंचाचे पाश फार भयंकर असतात. कारण ते पाश आपण लोकहिताच्या व ईश्वरभक्तीच्या नावाने जास्त आवळून घेतो. ते पाश तोडण्याची बूध्दीदेखील कधी आपणास होत नाही. संस्थानिकांना संस्थांनांचा जितका मोह असतो, त्यांपेक्षा साधूसंतांना स्वतःच्या संस्थानांचा, महंतांना मठांचा आचार्यांना पीठांचा व संसंथापकांना संस्थांचा कमी मोह किंवा अभिमान नसतो. प्रापंचिक माणसे आपल्या संसाराकरिता 'येनकेन प्रकारेण' सत्ता व संपत्ती मिळविण्यासाठी झटतात. संस्थावादी, संस्थानवादी, मठवादी,

S.P.Mahavidyalaya, Bhoom
Bhoom
Tq.Bhoom Dist.O.bad

पीठवादी आपापल्या संस्थांच्या संसाधनाकरिता सत्ता व सपंत्ती यांचा संग्रही करण्यासाठी धडपडतात. लोकमताच्या विरूध्द सूधारणांचे प्रतिपादन व प्रयोग करण्याची धमक त्यामूळे नाहीशी होते.लोकांचे मार्गदर्शक ठरण्याएवजी अशी माणसे लोकांच्या दरबारातील विदूषक बनतात.

कूठल्याही संकोच आणि पावित्र्याच्या खोट्या कल्पना ते आपल्या मंदिराशी जोडीत नाहीत. 'तूझा देव माझा देव' अशा भेदाभेदाच्या पलीकडे जाऊन त्यांच्या मंदिराशी येण्याला कोणतेही बंधन, आडकाठी नाही. उच्च-नीच, गरीब-श्रीमंत, ब्राम्हण-महार ्सा कोणताही भेदभाव त्यांच्या मंदिराजवळ नाही म्हणून ते म्हणतात,

''देवास नाही जात-पात देव भक्ताचाचि जातिवंत तेथे नसावा अ-भक्तांचा पंथ देवळामाजी देव महार, मांग,चांभार देव भंगी, लमाणी, वडर देव माळी, ब्राम्हण, कूभांर सर्व जाती म्हणोनि असावे सर्वांचे मंदिर ब्राम्हण असो वा महार शूध्द करील जो आचार त्यासी अधिकार मंदिराचा''तूकडोजींचा देव सर्व जातीधर्माच्या लोकांचा आहे म्हणून त्यांचे मंदिरही ''मूक्तद्वार'' आहे, हेच राष्ट्रसंत तूकडोजी महाराज इथे सांगतात.

तूकडोजीच्या दृष्टीने 'अभक्त' सोडून सर्वांना या मंदिरात खूला प्रवेश आहे. जातिभेद, धर्मभेद,पंथभेद यांच्या पलीकडे जाऊन मनामनांची कवाडे उघडून सर्वांनी एकत्र येऊन सर्वांचे जीवन तेजाने उजळावे यासाठी कीर्तन, उत्सव, प्रवचन यांचे आयोजन करावे हेच इथे त्यांना अपेक्षित आहे.आपले जीवन तेजाने उजळण्यासाठी तूकडोजींचे मंदिर सर्वांसाठी खूले आहे. म्हणून आपल्या हिंदी रचनेमध्ये ते म्हणतात, सबके लिये खूला है मंदिर यह हमारा मतभेद को भूला है मंदिर यह हमारा आवो कोई भी धर्मी सब देवता समाता मंदिर यह महारा

धर्महीनतेमूळे लयाला जात असलेल्या नैतिक मूल्यांना सावरण्यासाठी तूकडोजी महाराज आपल्या मंदिरात यायला इथे सांगत आहेत. ग्रामगीतेतील काव्यापेक्षा सरस ओळी हिन्दीत तूकडोजींनी लिहिल्या आहेत. आज प्रत्येकाच्या ओठी असलेल्या या ओळी त्यांच्या समग्रः काव्याचे सार आहेत. विशूध्द अतःकरणाने आणि निस्पृह वृत्तीने शूध्द तत्वांचे पूनरूज्जीवन करणे हाच तूकडोजींच्या मंदिराचा हेतू इथे त्यांच्या काव्यातून दिसून येतो. गोवोगावीची मंदिरे मानवता विकासाची केंद्रे बनल्यास प्रत्येकाला आपले सूख आणि दूःख प्रत्येक माणसासोबत वाटून घेता येईल यासाठी आहेत त्याच मंदिरांना दर्जेदार बनवा ्से सांगतात. मंदिराबद्दल त्यांनी नूसती काव्यामधूनच आपली भूमिका मांडली नाही, तर गूरूकूंज आक्षमात मानवतेचे महान मंदिर उभेही करून दाखवले.

तूकडोजी महाराजांनी त्यांच्या हयातीत शेवटच्या कालावधीत गूरूकूंज आश्रमात 'रामकृष्णहरि मंदिराची' स्थापना केली. त्यांच्या मनातील सर्व संकल्पना त्यांनी या मंदिरात साकारण्याचा प्रयत्न केला. काही अपूर्ण कल्पना त्यांच्या मृत्यूनंतर विश्वस्त मंडळाने पूर्ण करण्याचा प्रयत्न केला.

S.P. Mahavidyalaya, Bhoom Tq. Bhoom Dist. O'bad

'रामकृष्णकरि मंदिराच्या' माध्यमातून आज अनेक लोक खऱ्या ईश्वराची संकल्पना समजून घेतात.आजूनही काही अपूर्ण गोष्टी पूर्ण करण्याच्या कामी विश्वस्त मंडळ प्रयत्नशिल आहे. या प्रार्थना मंदिरात कोणत्याही देवी देवतेची मूर्ती नाही. कोणत्याच मूर्तीची स्थापना न केल्यामूळे कसल्याच प्रकारचे कर्मकांड येथे केले जात नाही. या मंदिरातील भिंतीवर 'ओम' लिहून सर्वच धर्मसंस्थापकांची, संतांची प्रतिमाचित्रे या मंदिरात लावली आहेत. या मंदिरामध्ये जात, पंथ, भाषा, देश यांच्या कूठेही आड न येता जगातील सर्वच महापूरूषांच्या प्रतिमा लावून त्यांचे तत्वज्ञान जगासाठी खूले केले आहे.

तूकडोजी महाराजांनी एकीकडे परंपरागत मंदिर नाकारले मात्र त्या मंदिराऐवजी सशक्त पर्याय उभा करून दिला. महापूरूषांच्या प्रतिभाश्कतीमधून मूर्त झालेल्या संकल्पना या सामान्य माणसाच्या उत्थानासाठी असतात हेच या मंदिर संकल्पनेतून इथे दिसून आले आहे. 'गूरूकूंज मोझरी' या आश्रमात त्यांनी ह्या मंदिर संकल्पनेला प्रत्यक्ष रूपात उतरवून दावखले आहे आजही हजारो लोक त्या ठिकाणी येऊन या विश्वात्मक पातळीवरील मंदिरात येऊन शांती ,सूखाचा अनूभव घेतात.पारलौकिक जगाला लौकिक जगाची जोड देऊन मानवी जीवनात अभ्यूदयाला महत्व देऊन संत परंपरेत तूकडोजींनी आपले आगळे वेगळे स्थान निर्माण केले आहे. मानवी जीवनातील विसंगती आणि व्यंगाला दूर करण्यासाठी जातीधर्माच्या भिंती तोडून सर्व सामान्यांचे सहकार्य ही भल्याभल्यांना न जमणारी गोष्ट तूकडोजींनी करून दाखवली. धर्म, आश्रम, यात ढवळाढवळ करणाऱ्या किंवा या समाजव्यवस्थेला बदलू पहाणाऱ्या अनेकांना समाजानेच नाकारले मात्र समाजाची नाडी अचूक ओळखून समाज जीवनातील व्यंग तितक्याच परखडतेने उघड करूनही तूकडोजींना समाजाने नाकारले नाही. त्यांच्या सर्व नवनवीन संकल्पनांना उचलून धरले. एवढेच नाही तर त्यांना डोक्यावर घेतले. भारतीय परंपरेत अनेकांना मर्यादा आल्या. चावाक, चक्रधर, अशा अनेकांनी मूर्तीभंजनाच्या संकल्पना मांडल्या, मात्र समाजाने त्यांना खड्यासारखे उचलून बाहेर टाकले.

लोकामध्येच राहून आपल्या अभिनव कल्पना आणि दूरदृष्टीने अनेकविध उपक्रम राबवून त्यांनी समाजाला परिवर्तनासाठी तयार केले. सामान्य माणसाला कर्मकांडातील फोलपणा पटवून दिला. या प्रबोधनात कूठेही संघर्ष न करता अथवा शत्रूत्व न घेता सहजपणे जनतेच्या गळी उतरवले त्यांच्या या सहजपणाबद्दल डॉ. सुभाष सावरकर म्हणतात, ''राष्ट्रसंत तूकडोजी महाराजांनी बहूजन समाजाच्या सामूहिक नेणिवेला आंजारून - गोंजारून व त्यांच्या श्रध्दास्थआनांचा उपमर्द करण्याऐवजी त्यांच्यामध्ये नवा यूगानूकूल आशय यबरून समाजाचा सामूहिक आत्मा वश करून घेण्याचे कसब साधले ते त्यांच्या अभूतपूर्व अशा खंजरी भजनशैलीने. 'लागला रंग भजनाचा डोलला देव आमूचा '- असा हा सहस्त्रशिर्षाचा समाजपूरूष हाच त्यांचा देव आणि या देवाची सर्वागींण तृष्टी साधण्यासाठी जाणीवप्रवर्तनाचे विविध कार्यक्रम त्यांनी 'ग्रामगीता' या यूगग्रंथातून दिले आहेत.दिले आहेत''.

S.P. Mahavidyalaya, Bhoom
Bhoom
Tq. Bhoom Dist. O.bad

डॉ. सुभाष सावरकरांच्या या मतानूसार जनतेमधल्या सूप्त शक्तीचा अचूक अंदाज त्यांना आला होता. लोकांच्या धर्माभिमानाला जराही धक्का न लावता त्यांनी कौशल्याने या गोष्टीचा उपयोग करून घेतला. मंदिराच्या संदर्भातील लोकांची श्रध्दा त्यांनी अचूक हेरली. मंदिराच्या या श्रध्देलाच त्यांनी योग्य वळण लावून 'ग्राम हेच मंदिर' हा पर्याय उपलब्ध करून दिला. याच श्रध्देने ग्रामदेवतेची प्रतिष्ठापना सामान्य माणसाच्या मनात करून दिली. ऐवढेच नाही तर जाणीव प्रवर्तानाच्या कार्यक्रमांची रेलचेल साहित्यातून करून दिली हा त्यांच्या दूरदृष्टीचा, उत्कृष्ट उपयोजनाचा उत्कृष्ट असा पूरावा आहे.

ह क्षत्रिय व वैश्य हे द्विज होत, म्हणजे त्यांना उपनयन संस्काराने पहिल्या वयात दूसरा जन्म प्राप्त होतो, त्यामूळे वेदाधिकार प्राप्त होतो. हा धार्मिक म्हणजे आधूनिक अर्थी सांस्कृतिक जन्म होय. म्हणूनच जातिसंस्था ही शारिरिक अर्थी वंशवादी समाजसंस्था नाही तर ती सांस्कृतिक संस्था आहे, असे निश्चितपणे म्हणता येते. शूद्राला उपनयन संस्काराचा अधिकार नसल्यामूळे तो द्विजाती नव्हे, तो एकजाती आहे, कारण त्याला वेदाधिकार नाही, शैवागम, वैष्णवागम इत्यादी तंत्रग्रंथात शूद्रालाही उपनयनाचा अधिकार दिला आहे. परंतू त्या उपनयनाने वेदमंत्र म्हणण्याचा अधिकार प्राप्त होत नाही, केवळ पौराणिक मंत्र म्हणण्याचा अधिकार प्राप्त होतो व पौराणिक पूजा इत्यादी कर्मकांडाचा अधिकार प्राप्त होतो.

हे वर्ण परस्परावलंबी आहेत. चारी वर्णाच्या धार्मिक जीवनाचा मार्गदर्शक ब्राम्हण वर्ण, यज्ञ, दान व वेदावाद्याध्ययन इतर वर्णाकडून करविणे, हा व्यवसाय होय, यूध्दार्थसज्जता, दंडशक्तीने प्रजापालन आणि वर्णाश्रमधर्माचे रक्षण, हा क्षत्रियाचा व्यवसाय होय. अर्थोतपादन व व्यापार हा वैश्याचा व्यवसाय होय. द्दिजांची शरीराने सेवा व कारागिरीची कामे, हा शूद्राचा व्यवसाय होय. त्यावर समग्र समाजाचे अस्तित्व अवलंबून आसते हाच सिध्दान्त संकरजातीच्या व्यवसायांना लागू होतो. ''धर्मशास्त्रात वरील प्रमाणे वर्ण आणि जातींची उतरंड करून भरतीय समाजाला बंदिस्त केले ही तयार झालेली वर्णव्यवस्था टिकवूनं ठेवण्यासाठी हर तऱ्हेचे प्रयत्न करून आणि वर्षानूवर्षे टिकवून संस्कृतीला जन्म दिला. जो ज्या जातीत जन्माला त्याला तोच व्यवसाय करावा लागला व त्याच जातीत मरावे लागले, भारतीय समजात धर्मशास्त्राच्या या धारणेच्याविरूध्द अनेक विचारवंतानी आवज उठविला. अनेकांनी ही बंधने झूगारून लढा दिला. अनेकांनी याच व्यवस्थेची नव्याने मांडणी केली. चक्रधर, महात्मा बसवेश्वर, महात्मा फूले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर शा समाजसूधारिणांनी वर्णव्यवस्थेच्या विरूध्द अवाज उठवून सामान्य माणसांची बाजू घेतली. कोणी भाषणांमधून, कोणी अग्रलेखातून, कोणी निबंधातून तर कोणी कविता किंवा इतर वाडमयीन माध्यमातून या प्रचलित समाजव्यवस्थएविषयी लढा उभारला. धर्मशास्त्रे जे चातूर्वर्ण्य सांगितली ते झूगारून या व्यवस्थेविरूध्द

S.P. Mahavidyalaya, Bhoom
Bhoom
Tq. Bhoom Dist. O.bad

बंड पूकारले. मराठी कवितेमधूनही या व्यवस्थेविरूध्द महात्मा फूले यांच्यासारखे क्रांतीदर्शी व्यक्तिमत्वाचे समोर आले. धर्मशास्त्राच्या विरूध्द दंड थोपटून त्यांची कविता 'मूर्तिभंजनांच्या उद्देशाने उभी रहाते. महात्मा फूल्यांनी आपल्या अखंडांमधून पूर्वसूरिची जूलमी वर्णव्यवस्था झूगारून दिली. प्रचलित देव, धर्म, वर्ण यांच्याऐवजी 'सत्य' हाच खरा आधार असून बाकी सर्व 'अंधकार' असल्याचे ठासून सांगितले. देवाच्या ऐवजी 'निर्मिक' ही संकल्पना मांडून 'शूद्रांच्या' खचण्याची अचूक कारणमीमांसा सांगितली. वर्णवख्स्था झूगारून खऱ्या अर्थाने क्रांतीची बीजे पेरणारी कविता म्हणून महात्मा फूले यांच्या कवितेचा गैरव आधूनिक मराठी कवितेच्या इतिहासात केला जातो. वर्णव्यवस्था मांडताना राष्ट्रसंत तूकडोजी महाराज वर्णोत्पती्बद्दल म्हणतात, हजारो वर्षापूर्वीची वर्णव्यवस्था निर्दोष होती. मात्र मधल्या काळात तिच्यात बदल घडवून आणण्यात आला. 'व्यक्ति तितक्या प्रवृत्ती' या न्यायाने प्रत्येक माणसाला आपल्यातील वेगळे कौशल्य दाखवण्यासाठी आवडीच्या कामाची निवड करण्याचे स्वातंत्र्य होते. प्रत्येकाला व्यक्तिविकासासाठी पूर्णपणे वाव होता त्याचे हे कौशल्य समाजाच्या विकासासाठी पूरक होते. प्रत्येकाच्या या गूणकौशल्याला धर्मवेत्यांनी लक्षात घेऊन समाजासाठी परस्परपूरक बनवले गूणकर्मानूसार प्रत्येक माणसाच्या व्यवसायाची सत्तव, रज, तम या गूणांच्या आधारे विभागणी केली यै संदर्भात राष्ट्रसंत तूकडोजी महाराज 'म्हणतात,

सत्वप्रधान, रजप्रधान मिश्रित आणि तमप्रधान शूध्दाशूध्द लक्षूनि गूण विभाग चार नेमिले धंदे असती अनेक गूणांचे परि मूख्य भेद चारचि त्यांचे म्हणोनि 'चातूर्वर्ण्य' नाव याचे ठे्वले ऋषिजनी

कामाचेही स्वरूपावरून प्रकार पाडण्याचे काम इथे राष्ट्रसंत तूकडोजी महाराज करतात. सत्व, रज आणि तम अशा गूणांवरून वर्णाचे चार प्रकार तूरडोजींनी मानले आहेत. राष्ट्रसंत तूकडोजी महाराजइथे कोणत्याही गोष्टीवर अंधविश्वास ठेवत नाहीत. तर त्या गोष्टीच्या मागे मूळाशी जाऊन विचार करताना दिसतात. प्रचलित वर्णाची व्यवस्था जशीच्या तशी सेविकारायला ते तयार नाहीत. नैसर्गिक गूणांच्या आधारे माणसांची विभागणी करून उत्कृष्ट समाज निर्माण होऊ शकतो अशी त्यांची धारणा आहे. आजही प्रगत जगात व्यक्तिमत्व विकासात त्यात्या व्यक्तिची अभिरूची विचारात घेऊन कार्यक्षेत्राची निवड केली जाते हेच तत्व प्राचीन जगतातही होते. असे मत राष्ट्रसंत तूकडोजी महाराज इथे मांडताना दिसतात. अभिरूचीनूसार त्या त्या व्यक्तिला पूरक असे संस्कार व कौशल्यपूर्ण शिक्षण दिले जाई. त्यांच्या व्यक्तिमत्वाला पैलू पाडले जात असत. हे संस्कार देण्याचे काम गूरूकूलात ऋषिजन करीत असत. प्रत्येक प्रकारच्या शिक्षणक्रमातून व्यवहार शिकवला जाई मात्र नंतरच्या पिढ्यांमध्ये काही 'चतूर' लोकांनी या व्यवस्थेला स्वतःच्या स्वार्थासाठी बदलून परंपरागत बनवण्याचे काम केले. स्वतःच्या स्वार्थासाठी प्रतिष्ठेसाठी अपात्र लोकांनी वेगवेगळे धंदे हाती घेतल्यामूळे वर्णाची संकल्पना बदलून गेली. स्वार्थ बोकाळला, न्यायनिती बिघडली व वर्णव्यवस्था संकूचित बनली. स्वतःचे खिसे भरण्यासाठी तिला आणखी बळकट केले गेले. या सगळ्या नीतीभ्रष्टतेमूळे

S.P. Mahavidyalaya, Bhoom
Bhoom
Tq. Bhoom Dist. O.bad

तूकडोजींनी आपल्या साहित्यातून बिघडलेल्या व्यवस्थेचे चित्रण पूढीलप्रमाणे केले आहे.

वर्ण जातींचे गूणकर्म नाही मोडून केली नोकरशाही नागवीली भावना सर्वही वर्णाश्रमाची अभिमान राहिला वर्णाचा चूराडा झाला गूणकर्माचा ऐसा घटविला संस्कार गावाचा घडी काही बसेना अशा पध्दतीने समाजव्यवस्था बिघडविण्याचे काम लोकांनी केले. बापाचा व्यवसाय मूलाने सूरू केला मग भलेही त्याच्यामध्ये ते गूण असो किंवा नसो. तूकडोजी महाराज म्हणतात, की जे जे प्रतिष्ठेचे व्यवसाय होते ते स्वतःला उच्च मानायला लागले आणि गूणकर्मावरून जे व्यवसाय हलके होते ते नीच मानणे सूरू झाले. याच गोष्टीचे अचूक वर्णन तूकडोजींनी इथे केले आहे. राष्ट्रसंत तूकडोजी महाराज इथे आपले मत कसलाही पूर्वग्रह न बाळगता व्यक्त करतात. धर्माच्या प्रभावातून पूर्णपणे बाजूला होऊन त्यांची ही धारणा झालेली आपणास इथे दिसून येते.

## संदर्भ सूची :-

१) जोशी, लक्ष्मणशास्त्री- मराठी विश्वकोषःस भाग-२ महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ पृष्ठ क्र. ५२

२) नाखले प्रा. डॉ. वीणा- मराठी कवितेतील मूर्तीभंजन, डायमंड पब्लिकेशन्स पूणे, पृष्ठ क्र. १५

३) राष्ट्रसंत ताकडोजी महाराज- ग्रामगीता अध्याय - पहिला ओवीक्र. ८९

४) देशमूख, डॉ. उषा माधव - राष्ट्रसंत तूकडोजींचे ईश्वर विषयक चिंतन, राष्ट्रसंत तूकडोजी महाराज व्यक्ति आणि वाङमयः संपादक डॉ. अक्षयकूमार काळे विसा बूक्स, नागपूर प्रथमावृत्ती पृष्ठ क्र. ७०

५) राष्ट्रसंत तूकडोजी महाराज- भजन संग्रह, देव बाजारचा भाजीपाला नाही रे (ध्वनी मूद्रिका, प्रकाशन गूरूदेव सेवा मंडळ, गूरूकूंज आश्रम)

६) राष्ट्रसंत तूकडोजी महाराज - ग्रामगीता, अध्याय २५ ओवी क्र. १५

७) शेख, डॉ. जूल्फी- राष्ट्रसंताची धर्मकल्पना, राष्ट्रसंत तूकडोजी महाराज व्यक्ती आणि वाङमय, पृष्ठ क्र. २३७-२३८.

S.P. Mahavidyalaya, Bhoom Ta. Bhoom Dist.
BHOOM

PRINCIPAL
S.P. Mahavidyalaya, Bhoom
Dist. Osmanabad